# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.१३ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## पाकिस्तानच्या एअर स्ट्राईकमध्ये बलुचिस्तानमध्ये २१ नागरिकांचा मृत्यू

इस्लामाबाद दि.१२ (वृत्तसंस्था)- पाकिस्तानने बलुचिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला आहे. पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हवाई हल्ल्यात अनेकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानने सोराब आणि ग्वादरच्या आसपासच्या भागात केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये महिला आणि लहान मुलांसह तब्बल २१ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. हल्ल्यांनंतर लगेचच या भागातील इंटरनेट आणि दूरसंचार सेवा खंडित करण्यात आल्यामुळे, मृतांच्या अचूक आकडेवारी समोर आलेली नाही. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानने अतिरेक्यांच्या ठिकाणांऐवजी लोकवस्तीत हल्ला केल्यानंतर अनेकांचा मृत्यू झाला. पाकिस्तानकडून या लष्करी कारवाईबाबत कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. हल्ल्यामुळे सोराब आणि ग्वादरमध्ये संतापाची लाट पसरली असून, स्थानिकांनी या लष्करी कारवाईचा निषेध केला आहे. बलुचिस्तानमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नागिकांमध्ये असंतोष पाहायला मिळत आहे. या प्रांतात सततच्या कारवाया, लोक बेपत्ता होण्याचे आरोप आणि अभिव्यक्तीवरील बंदीमुळे तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे. दरम्यान या हल्ल्यानंतर स्थानिकांनी निषेध व्यक्त केला असून, 'बलुच लिबरेशन आर्मी' देखील आक्रमक झाली आहे. प्रत्युत्तर दाखल बीएलएने केलेल्या हल्ल्यात चागाई जिल्ह्यात मध्यरात्री झालेल्या बॉम्बस्फोटात एक पोलीस ठाणे पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. तर, तीन सुरक्षा कर्मचारी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे.

# मागील ५ वर्षात महाराष्ट्रात ३६ हजार २११ खासगी कंपन्या बंद पडल्या

## केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाची लोकसभेत माहिती

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- मागील पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रात ३६,२११ खाजगी कंपन्या बंद पडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने लोकसभेत दिलेल्या एका लेखी उत्तरात ही आकडेवारी उघड केली आहे. खासदार राजाभाऊ वाजे यांनी महाराष्ट्रातील कंपन्यांच्या सध्याच्या स्थितीबाबत लोकसभेत प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर केंद्र सरकारने हे उत्तर दिले आहे. केंद्र सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात सर्वाधिक कंपन्यांना टाळे लागले आहे.

एकीकडे इतक्या मोठ्या प्रमाणात कंपन्या बंद पडल्याची आकडेवारी समोर आली असली, तरी या कंपन्या नेमक्या कोणत्या कारणांमुळे बंद पडल्या? आणि यामुळे राज्यातील रोजगारावर नक्की किती आणि कसा परिणाम झाला? यांसारखे महत्त्वाचे प्रश्न अद्यापही अनुत्तरितच आहेत. इतक्या मोठ्या संख्येने उद्योग बंद पडल्याने राज्यातील औद्योगिक वातावरण आणि स्थानिक रोजगारावर याचा किती खोल परिणाम झाला आहे, याबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातून हजारो कंपन्या बंद पडल्याची अधिकृत माहिती समोर आल्यानंर आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत खोचक विचारणा केली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, देशाचे ग्रोन इंजिन अशी ओळख असलेल्या आपल्या महाराष्ट्रात मागील ५ वर्षात तब्बल ३६,२११ कंपन्या बंद पडल्या असून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत तब्बल १२ हजार कंपन्या बंद पडल्याची माहिती स्वतः केंद्र सरकारने काल लोकसभेत दिली आहे. या कंपन्या बंद पडल्याने आज राज्यातील लाखो तरुण आपल्या रोजगारापासून वंचित झाले आहेत. मागील पाच वर्षांत सत्तेच्या रस्सीखेचीत व्यस्त असलेल्या महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचे रोजगार, उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा सर्व महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले असून त्याचाच हा परिणाम दिसत आहे. असो, आता तरी राज्यकर्त्यांनी सत्तेच्या घोडेबाजारातून जरा बाजूला सरकत राज्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न करायला हवेत, हीच अपेक्षा! असे रोहित पवार म्हणाले.

### एक दिवस द्या, मी तपासून सांगतो-उद्योगमंत्री उदय सामंत


राज्यातील ३६ हजारांवर कंपन्या बंद झाल्याची माझ्याकडे कुठलीही माहिती नाही. एक दिवस द्या, मी तपासून सांगतो अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. केंद्र सरकारने ३६ हजाराहून अधिक कंपन्या बंद झाल्याचे सांगितले असले तरी महाराष्ट्राची स्थिती मला बघावी लागणार आहे. मी केंद्र सरकारला चुकीचे ठरवत नाही, पण मला याची तपासणी करावी लागेल असे ते म्हणाले.

दरम्यान, चाकण औद्योगिक वसाहतीच्या संदर्भात देखील सामंत यांनी प्रतिक्रिया दिली. चाकण औद्योगिक वसाहतीतील एकही उद्योग बाहेर गेलेला नाही. ठाकरे सेनेने याचा मोठा गाजावाजा केला. मात्र तसे काहीही नाही. उलट काही कंपन्यांनी विस्तारासाठी अधिक जागेची मागणी आहे, अशी माहिती सामंत यांनी दिली. उषा चव्हाण यांनी सरकारवर जोरदार टीका केली होती. त्यावर सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी स्वतः चव्हाण यांनाही बोलेन आणि त्यांची काय समस्या आहे, ते जाणून घेऊ, असे सामंत म्हणाले.

## पक्ष आणि चिन्हाबाबत निष्कर्ष काढण्यासारखे कोणतेही ठोस साहित्य निवडणूक आयोगासमोर नव्हतेच

### शिवसेना पक्ष व चिन्ह सुनावणीत ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांचा युक्तीवाद

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर १३ वर्ष निवडणूक आयोगाला शिवसेना राजकीय पक्षाची दुसरी घटना अस्तित्वात आहे की नाही हे कधीच समजले नाही का?, भारतीय निवडणूक आयोग सर्व राजकीय पक्षांची स्थापना आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीवर देखरेख ठेवते मग पक्षाची घटना आयोगाच्या रेकॉर्डवर नाही असा युक्तिवाद कसा करू शकतात? ही हुकूमशाही रचना आहे. पक्ष आणि चिन्हाबाबत निष्कर्ष काढण्यासारखे कोणतेही ठोस साहित्य आयोगासमोर नव्हतेच असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सुप्रीम कोर्टात मांडला.



निवडणूक आयोगाने समाजवादी पक्षाच्या खटल्यातील निकालाचा आधार घेतला. अखिलेश यादव यांनी बोलावलेले अधिवेशन घटनाबाह्य होते असं मुलायम सिंह यांच्या गटाचे म्हणणे होते. हा खटला पक्षातील फुटीशी होता असं सिब्बल यांनी कोर्टाला म्हटलं. त्यावर सरन्यायाधीशांनी त्यात कोण जिंकले, वडील की मुलगा असा प्रश्न केला. त्यावर मुलाचा विजय झाला, मी मुलाच्या बाजूने होतो असं सिब्बल यांनी सरन्यायाधीशांना सांगितले. तेव्हा कुटुंबही विभागले गेले, पक्ष खाजगी मालमत्ता बनला, पण निधनापूर्वी त्यांच्यात समझोता झाला होता ना..? त्यावर सिब्बल यांनी हो उत्तर दिले. तर पक्षातील फुटीबाबत निर्णय १० व्या अनुसूचीनुसार घ्यावा लागेल. त्यानंतरच्या घडामोडींचा विचार केला जाऊ शकतो का यावर तुम्हाला युक्तिवाद करावा लागेल. विधिमंडळ पक्षातील फूट मूळ पक्षात किंवा मुख्य संघटनेतही पसरू शकत नाही असं घटनापीठाने म्हटलेले नाही असं न्यायमूर्ती बागची यांनी सुनावणीवेळी म्हटलं. तसेच काल मी लोकप्रतिनिधी कायदा यातले कलम २९-ए चा उल्लेख केला होता. यात उप कलम (९) आणि उप कलम (४) नुसार पक्षाचे नाव, मुख्यालय, (पान ४ वर)

## मुंबईतील घाटकोपरमध्ये दरड कोसळून ७ जणांचा मृत्यू

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- मुंबईच्या घाटकोपरमधील अशोक नगर येथील गौसिया चाळ परिसरात डोंगराचा भाग कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर अद्याप युद्धपातळीवर बचाव कार्य सुरु असून यात मृतांचा आकडा वाढला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पहाटे साडे तीन ते चारच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली होती. यात दोन ते तीन घरांवर दरड कोसळली असून यामध्ये अनेक जण अडकल्याची प्राथमिक माहिती आहे. अशातच सहा ते सात तासांच्या अथक परिश्रमानंतर सात जणांचे मृतदेह हाती लागले असून, अजूनही काही जण या ढिगाऱ्याखाली अडकून असल्याची माहिती आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. यासाठी पहाटेपासून बचावकार्य सुरु असताना यात अल्ट्रा सेन्सर मशीनने मलब्या खाली अडकलेल्यांना शोधले जात आहे. तर ड्रोनची देखील मदत यात घेण्यात आली आहे.

दरम्यान, साकीनाका येथील दुर्घटनेत मृतांचा कुटुंबातील लोकांना पालिकेकडून ३ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तर दुर्घटना घडलेल्या ठिकाणी रहात असलेल्या लोकांचे सुरक्षितस्थळी पुर्नवसन (पान ४ वर)

## अखेर एफसीआरए दुरुस्ती विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे वर्ग, संसेदत विरोधकांचा तीव्र गदारोळ!

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- लोकसभेत विरोधकांच्या तीव्र गदारोळात आणि आक्षेपांनंतर केंद्र सरकारने 'योगदान नियमन दुरुस्ती विधेयक, २०२६' हा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर केला. आज, बुधवारी हा प्रस्ताव संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आला आहे. हे प्रस्तावित विधेयक अल्पसंख्याकांना लक्ष्य करणारे आहे, या विरोधकांच्या आरोपावरून अखिलेश यादव आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात सभागृहात जोरदार खडाजंगी झाली.

अखिलेश यादव म्हणाले की, संपूर्ण विरोधक या विधेयकाचा विरोध करत आहेत. या सरकारने आतापर्यंत असे कोणते विधेयक आणले आहे जे अल्पसंख्याकांच्या विरोधात नव्हते?'' यावर रिजिजू यांनी पलटवार करत अखिलेश यादव यांना आव्हान दिलं की, त्यांनी या विधेयकातील अशी एकतरी तरतूद दाखववी जी अल्पसंख्याकांना लक्ष्य करते. विरोधक सभागृहाची दिशाभूल करत असल्याचं रिजिजू म्हणाले. यादव म्हणाले, ''आम्ही, संपूर्ण विरोधक, सरकार आणत असलेल्या एफसीआरए विधेयकाच्या विरोधात आहोत. हे विधेयक अल्पसंख्याकांच्या विरोधात नसल्याचं मंत्री सांगतात. पण मला मंत्र्यांना विचारायचं आहे की, आम्हाला सांगा, या सरकारने आतापर्यंत कोणते विधेयक आणलं आहे जे अल्पसंख्याकांच्या विरोधात नव्हतं?''

यावर रिजिजू यांनी उत्तर दिले, ''मी अखिलेश यादव यांना आव्हान देतो की त्यांनी अल्पसंख्याकांच्या विरोधातील एकतरी मुद्दा सांगावा. तुम्हाला फक्त सभागृहाची दिशाभूल करायची आहे.'' देशात कायदेशीर चौकटीशिवाय विदेशी निधी येण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही आणि यात अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. तत्पूर्वी, सकाळी लोकसभेचे कामकाज तहकूब झाल्यानंतर पुन्हा सुरू झाल्यावर केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी एफसीआरए विधेयक जेपीसी कडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडला.

काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी हे विधेयक अल्पसंख्याक आणि स्वयंसेवी संस्थांना लक्ष्य करण्यासाठी आणले असल्याचा आरोप करत सरकारकडे ते मागे घेण्याची मागणी केली. ते म्हणाले, ''हे स्पष्टपणे अल्पसंख्याक आणि एनजीओना लक्ष्य करण्यासाठी आहे. सरकारने हे विधेयक मागे घेतले पाहिजे.'' यावर रिजिजू म्हणाले की, काँग्रेसनेच हे विधेयक जेपीसीकडे पाठवण्याची मागणी केली होती आणि आता विरोधकांनी समितीच्या प्रक्रियेचा वापर करून आपल्या चिंता मांडायला हव्यात. अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्याचा कोणताही प्रश्न नाही, असं सांगत त्यांनी वेणुगोपाल यांना सभागृहाची दिशाभूल करू नका असा सल्ला दिला.

## महाराष्ट्रातील विद्यार्थी, तरुण आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यास मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी आणि दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनात विद्यार्थ्यांना झालेल्या मारहाणीचा निषेध म्हणून मुंबईसह राज्यभर समीरण करणाऱ्या विद्यार्थी, तरुण आणि इतर आंदोलनकर्त्यांना न्यायालयीन कारवाईतून दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने राजकीय आणि सामाजिक आंदोलनांशी संबंधित खटले मागे घेण्यासाठीची मुदत ३१ जुलैवरून मार्च २०२७पर्यंत म्हणजे आठ महिन्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या आंदोलनादरम्यान मुंबईसह राज्यभरात आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेतले जातील.

जंतरमांतर विद्यार्थी आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले. मुंबई, पुणे, नागपूरसह विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. काही ठिकाणी आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले, तर काहींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. प्रामुख्याने बेकायदा जमाव जमविणे आदी कलमांखाली कारवाई झाली होती. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबरोबरच आंदोलनात पुढाकार घेतलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हेही मागे घेण्याची अट आंदोलन मागे घेताना टाकली होती. तरीही अनेक ठिकाणी गुन्हे मागे घेण्यात आले नव्हते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेच हे गुन्हे मागे घेण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्रात (पान ४ वर)

## संसदेत सर्व प्रश्नांची उत्तरे देणार; चर्चा सुरू करा-अमित शाह

### लेक्चर नको, विद्यार्थ्यांवर गोळ्या कुणी चालवल्या सांगा-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बुधवारी म्हणाले, 'सरकार प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे, परंतु विरोधकांनी सभागृहाचे कामकाज चालू दिले पाहिजे. आज दुपारी ३ वाजता चर्चा सुरू होऊ द्या. मी सभागृहात उपस्थित राहीन, सर्वांचे म्हणणे ऐकून घेईन आणि उद्या दुपारी ३ वाजता सर्वांना उत्तर देईन.'

याला प्रत्युत्तर देताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, 'आधी त्यांनी हे स्पष्ट करावे की जंतरमंतरवर विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश कोणी दिले. त्यांनी आधी राजीनामा दिला पाहिजे.'

विद्यार्थ्यांच्या आंदोलनात झालेल्या लाठीमारावर गृहमंत्र्यांनी निवेदन द्यावे, अशी विरोधकांची मागणी आहे. गेल्या २० दिवसांपासून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे कामकाज ठप्प झाले आहे. शहा सभागृहात उपस्थित राहत नसल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

शहा यांनी सांगितले की, विरोधी पक्ष संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू देत नाही. संसदीय कामकाजात अडथळा आणला जातो, तेव्हा सभागृहात उपस्थित राहण्यात फारसा अर्थ उरत नाही. सरकार प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे. आता, चर्चेपासून नक्की कोण पळ काढत आहे, हे जनतेनेच ठरवले पाहिजे.

आज दुपारी ३ वाजल्यापासून ते उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत कोणत्याही प्रकारच्या चर्चेसाठी सरकार सज्ज आहे. ते स्वतः सभागृहात उपस्थित राहतील, सर्वांचे म्हणणे ऐकून घेतील आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देतील. सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही. केवळ या (पान ४ वर)

## व्यावसायिक वाहनचालकांना व्यावहारिक मराठी अनिवार्य; मराठीचे ज्ञान नसल्यास तीन महिन्यांपर्यंत अनुज्ञप्ती निलंबित

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यातील रिक्षा, टॅक्सी व ॲपवर आधारित कॅब चालकांना प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी आता व्यावहारिक मराठीचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये करण्यात आलेल्या नव्या सुधारणांमुळे ही अट स्पष्ट झाली आहे. नव्या नियमानुसार, चालकाला आवश्यक मराठी येत नसल्याचे आढळल्यास संबंधिताचा वाहन चालविण्याच्या अनुज्ञप्तीवरील अधिकृतता जास्तीत जास्त तीन महिन्यांसाठी निलंबित करता येणार आहे. निलंबनानंतरही चालकाने नियमांचे पालन न केल्यास अनुज्ञप्तीची संबंधित अधिकृतता रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियमांमध्ये केलेल्या सुधारणांमध्ये रिक्षा, टॅक्सी तसेच ॲपवर आधारित मोटार कॅबच्या अधिकृत चालकांसाठी व्यवहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक करण्यात आले आहे. प्रवाशांशी संवाद साधणे, त्यांचे म्हणणे समजून घेणे व सुरक्षित प्रवासासाठी ही अट करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ही अट केवळ चालकांपुरती (पान ४ वर)

## भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती

### परीक्षा गैरप्रकारसंदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या काही वर्षांपासून सातत्याने उघडकीस येणाऱ्या पेपरफुटी आणि महत्त्वाच्या परीक्षांमधील गैरप्रकारांची गंभीर दखल घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवाभरती परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक व अधिक सुरक्षित सुधारणा करण्यासाठी आज एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या बैठकीला उपस्थित असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत काही उपयुक्त सूचना केल्या असून, ही नव्याने गठीत केलेली समिती राज्यातील प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधेल आणि त्यानंतर परीक्षा पद्धतीतील सर्वंकष सुधारणांबाबतचा आपला सविस्तर अहवाल शासनाला सादर करेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वर्षा निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत यासंदर्भातील महत्त्वपूर्ण निर्देश दिले. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण समितीत राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा सदस्य म्हणून समावेश असणार आहे.

या समितीवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून, त्यांनी राज्यातील प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि इतर सर्व संबंधित घटकांशी प्रत्यक्ष चर्चा करायची आहे. या सर्व घटकांच्या (पान ४ वर)

## मुंबईत पोलीस कॉन्स्टेबलला ड्रग्ज विक्री करताना रंगेहाथ पकडले

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- देशातील नावाजलेल्या आणि कार्यक्षम पोलीस दलांमध्ये समावेश असलेल्या मुंबई पोलिसांच्या नावाला काळिमा फासणारा एक प्रकार समोर आला आहे. ड्रग्ज तस्करीच्या एका प्रकरणात मुंबई पोलीस दलातील एका पोलीस कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. कॉन्स्टेबल किरण इंदुलकर असे त्याचे नाव आहे. मालवणी पोलिसांनी ड्रग्ज विक्री करताना किरण इंदुलकर याला रंगेहाथ पकडले आहे. किरण इंदुलकर हा सध्या जोगेश्वरीपोलीस ठाण्यात कार्यरत होता. यापूर्वी तो मालवणी पोलीस ठाण्यात कार्यरत होता. तो ड्रग्जची विक्री करत असल्याचा संशय होता. त्यानुसार मालवणी पोलिसांनी सापळा रचून किरण इंदुलकर याला ५ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) किंवा 'म्याव-म्याव' विकताना रंगेहाथ पकडले. या घटनेमुळे मुंबई पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. पोलीस दलातील कर्मचाऱ्याच्या गुन्ह्यातील सहभागामुळे मुंबई पोलीस दलाची प्रतिमा काळवंडली आहे.(पान ४ वर)

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करा, अन्यथा लढा अटळ

### २१ तारखेला सांगलीत मोर्चा; जयंत पाटील आणि राजू शेट्टींचा सरकारवर घणाघात

सांगली दि.१२ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या नियोजित शक्तिपीठ महामार्गाला होणारा विरोध आता अधिक तीव्र झाला आहे. या प्रकल्पाविरोधात महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला असून, सांगलीत आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जयंत पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. या महामार्गाला विरोध दर्शवण्यासाठी येत्या २१ तारखेला सांगलीत भव्य मोर्चा काढण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना जयंत पाटील यांनी मोर्चाची माहिती दिली. ते म्हणाले, ''शक्तिपीठ महामार्गाविरोधात जनतेच्या मनात तीव्र रोष आहे. जनतेच्या याच भावना सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी २१ तारखेला सकाळी ११ वाजता सांगलीत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.'' हा महामार्ग होऊ नये यासाठी ज्या-ज्या भागातून हा रस्ता जाणार आहे, तिथे याआधीही अनेक मोर्चे काढण्यात आल्याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली.

या पत्रकार परिषदेत राजू शेट्टी यांनी अतिशय आक्रमक भाषेत राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, ''आता आम्ही रस्त्यावरची लढाई लढणार आहोत. माझा न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही. सरकारने आमच्याशी नाही, तर किमान शेतकऱ्यांसोबत तरी चर्चा करायला हवी होती.''

प्रकल्पाच्या खर्चावर गंभीर आरोप करताना शेट्टी म्हणाले, ''जो रस्ता ४५ हजार कोटींमध्ये होणार होता, तो आता (पान ४ वर)

## आयुर्वेदिक संस्थांवर एफडीएची कारवाई; १० कंपन्यांचे परवाने रद्द

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- गुटखा, सुगंधित तंबाखूचे विक्रेते, हॉटेल, रेस्टॉरंट, औषध विक्रेते यांच्याविरोधात धडक मोहीम राबविली जात असताना राज्यातील ४३४ आयुर्वेदिक उत्पादक संस्था अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) रडारवर आल्या आहेत. या तपासणीमध्ये नियमांचे पालन न करणाऱ्या १३५ आयुर्वेदिक उत्पादक संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या १० आयुर्वेदिक औषध उत्पादकांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात सध्या ४३४ परवानाधारक आयुर्वेदिक उत्पादक संस्था कार्यरत आहेत. या संस्थांची व्यापक स्वरुपांची तपासणी मोहीम 'एफडीए'ने राबवली. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५, तसेच त्यातील परिशिष्ट 'टी'मधील तरतुदींनुसार होणाऱ्या अनुपालनाची (पान ४ वर)

# आला श्रावण

आला श्रावण हिरव्या रंगाचे मुक्त प्रदर्शन, उत्साह सणाचं वातावरण, वाढीचे सुगीचे प्रदर्शन, प्रेमीजनांची आठवण, प्रेमचिंतन हे सारं घेऊन येतो श्रावण! भारतीय महिन्यांच्या क्रमातील पाचवा मास श्रावण, पाच शुभच मानतो आपण - पंचमहाभूते, पंचम स्वर, पाचामुखी परमेश्वर, पाच पांडव, पाच सुवासिनी, जन्मानंतर पाचवा दिवस...या पाचव्या श्रावणाशी साऱ्या निसर्गाचं ईशनिर्मितीचं ओलं नातं आहे. मधुमालतीची वेल आपला सडसडीत बांधा टाकून ऐसपैस फोफावते. गुलाबी पांढऱ्या फुलांनी फुलीफुलून जाते. माहेरी आलेली जिवतीच. जीवनाचा सुखद अनुभव रोमारोमातून ओसंडतो. कवी मुक्तेश्वर म्हणतात - 'सुटला पश्चिमेला अनल। मेघमाला मोकले।' याप्रमाणे मेघ आपली रंग सोडून स्वैर उधळतात, एकमेकांवर आपटतात, गर्जना विद्युल्लता कडकडते हे सर्व ऐकून आपल्या डोक्यावरचा मेघ? हा मेघ आर्द्र 'महिषोदर तुल्य काळा असे' असे म्हणत रंगून वेल नावाप्रमाणेच रंगून जाते. फुललेली जाईजुई, चमेली, सायली, रेशमी तलम वस्त्र सायंकाळी नेसून आपला सुगंध मिरवते. ग्लॅडिओलीच्या मधुघाटातील मध शक्करखोर नाजूक चोचीने हळूवारपणे सेवन करण्यात एकरुप होतात. काळ्या मेघांच्या पार्श्वभूमीवर फुललेला मनोहर गुलमोहोर अधिक ऐटबाज दिसतो. त्यावर बसून पक्षी आपले पंख झटकून पिसामध्ये चोची फिरवतात. गायी-वासरे हिरवळीवर निवांत बसतात.

पारिजात तर मोती पोवळ्याच्या राशीतून श्रावणी हास्य फुलवितो. खूप पाऊस पडला की गुंजाचा ढीग शेतात दिसायचा. त्या लालभडक तेजस रंगाला दृष्ट लागू नये, म्हणून त्यावर चितारलेला काळा ठिपका-गालबोटच सुंदर. श्रावणाचा सुगंधी शृंगार घटकेत उन्ह घटकेत पाऊस श्रावणाच्या हातातच उन्ह सावल्यांचे पक्षी असतात. उंच माथ्यावर डोंगर, तेथील श्रावण तर रुप, नाद दि गंध यांची साक्षात खैरात. हिरवळीने विनलेले डोंगर, शुभ्र फेसाळ धबधबे, हिरव्या पाचूच्या टेकड्या जेव्हा पाऊस थोडा भुरभुरतो तेव्हा हा खट्याळ श्रावण हिरवळीवर मोत्यांचा चुरा हा खट्याळ श्रावणच उठवतो ही खात्री पटते. उत्तरेस मध्यप्रदेशात श्रावणात मोठमोठ्या वृक्षांना आनंदाने उंच झुलतात, मुक्तपणे ! रविवर्म्याचे चित्रच आठवते. पिवळे वस्त्र, मुक्त केशरसंभार स्वच्छंदपणे झोक्यावर बसलेले विश्वमोहिनी ! सरतीचे दशेरी लंगडे आंबे ! त्याचा मधूर सुगंध वायुलहरींबरोबर येतो. मयूर स्वर केकांचा नाद, जंगलात विखुरलेली मयुरपिसे. संपूर्ण पिसारा फुलवून उत्तानपणे नाचणारे मोर, गगनातील कृष्णमेघांची नर्तन. श्रावण पाहून धुंद झालेला मयुरपिसाऱ्यावरचा तो डोळा ऽ अपूर्व दृश्य असते. तो श्रावण ! उत्तान मयुराची प्रिया फुरगटून बसलेली त्याला दिसते. तिच्या अंगावर खट्याळपणे जलधारा उडवीत तर म्हणत नसेल 'अग लांडोरी तो देखणा मयूर तुला भेटायला किती आतुर झालाय ! तुझा नुसता एक तुरा पण केवढा आज तोरा?' खोडकर मिश्किल श्रावण ! तिला दृष्टान्त देऊन समजावीत तर नसेल की, लावण्याच्या कमतरतेमुळे संकोचून जाऊ नकोस.

सौंदर्य देवाघरचे देणे आहे. भरदार आयाळ, केसर असलेला तो रुबाबदार वनराज त्याची मादी? किती साधी?नरहरिणाची शिंगे, त्याचे उमदेपण उठावदार करणारी! पण ती हरिणी बरीच डावी ! कोंबड्याची तोकड्या तुऱ्याची कलगी ? ऐटीत चालणारा, दोन शुभ्र डौलदार दात असलेला हत्ती पण त्याची हत्तीण बघ मयुराच्या प्रणयाला प्रतिसाद देत आनंद लुटून घे. आपले सौंदर्य वृद्धावस्थेपर्यंत जपणाऱ्या स्त्रिया नटून थटून आपल्या सौंदर्याचा आस्वाद घेणाऱ्या प्रियकराची वाट बघत आहेत नि गुणगुणत आहेत - श्रावण आला ऽ नाही आला माझा प्राणसखा.

सोमवारी श्रावणात राजेश्वराचं दर्शन घ्यायला नवाढा शिवामूठ वाहायला यायच्या. मोर्णेचा पूर तिची उपनदी विद्रुपाऽऽ तिचं श्रावणातलं तांडव याचं वर्णन चाले. माझी नाशिकची आत्या दिमाखानं सांगायची, ''आमची गंगा ! श्रावणात पाचही देवळं पाण्यात, नारो शंकराच्या घंटेला पाणी लागे. माझे छोटे दिर त्यात पोहतात. तुमचा कराचा अनिकट? आमचा डोह किती अफाट.'' तेवढ्यात श्रावणसरी येत गप्पांची झड कमी करायला पूर्वी ऐकलेली सतीची कथा आठवे. ती साध्वी पीतांबर नेसून अलंकृत झाली. केवडा शुभ्र फुले, बेल घेऊन निघाली शिवदर्शनाला.

दिवसभर महादेवाचा अभिषेक, पाहुणे यात दर्शन झाले नाही म्हणून रात्रीच निघाली. दिंडी दरवाजाच्या लहानशा दाराने बाहेर पडली. आषाढातला फुलपाखरांचा प्रणयरंग संपला होता, पण श्रावणातले काजवे? त्यांच्या निळ्या जांभळ्या प्रणयज्योती प्रेयसीला आकर्षित करतात. ती झाडे मागे टाकून ती मंदिराच्या पायऱ्या चढली. तिचा संशयग्रस्त पती तिचा पाठलाग करीत होता. त्याने तिला हटकले व अपशब्द बोलला. भलताच आळ घेतला. तिला मारु लागला. तिने शिवाचा धावा केला पिंड दुभंगली सतीला राजेश्वराने आश्रय दिला अभय दिले. तिचा पदर कैक वर्ष सतीची साक्ष देत होता. श्रावण म्हणजे श्रावण सोमवार, मंगळागौर पूजन, रक्षाबंधन, राखी सजवायची, भावाला आवडीचे पदार्थ द्यायचे. मनगटावर मृदुल रेशमी बंधन बांधून रक्षण मागायचे.

या श्रावणातच भारतमाता स्वतंत्र झाली. त्या स्वातंत्र्यसूर्याचे लखलखते, धगधगते कनकचक्र नभी फिरताना आपण पाहिले. बंदिशाळेत जन्मलेल्या भगवान कृष्णाची जन्माष्टमी, पारशी नववर्ष श्रावणातच. स्वातंत्र्याची पहाट फुलविण्याची धडपड जन्मभर करणाऱ्या लोकमान्यांची पुण्यतिथी तेव्हाच. आदिवासींची नागपंचमी, श्रावणातील शेवटचा दिवस पोळ्याचा शेतकऱ्यांचा बैलांचा सण त्यांचे पूजन.

# युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची नवी दिशा

**दरवर्षी** १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. युवक हे कोणत्याही देशाचे वर्तमान आणि भविष्य घडविणारे सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जातात. तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता, धाडस, परिवर्तनाची आस आणि नव्या वाटा शोधण्याची क्षमता समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देऊ शकते. त्यामुळे युवा दिन हा केवळ युवकांच्या गौरवाचा दिवस नसून, त्यांच्या प्रश्नांचा, अपेक्षांचा, संधींचा आणि जबाबदाऱ्यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक परिवर्तनामध्ये युवकांची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत आहे. भारतासारख्या तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या देशासाठी तर युवाशक्ती ही विकासाची सर्वांत मोठी भांडवलशक्ती आहे. या शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य, रोजगार, समान संधी आणि सकारात्मक दिशा मिळाली, तर भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि न्याय्य राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकतो.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाची सुरुवात युवकांशी संबंधित प्रश्नांकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधण्यासाठी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांच्या सामाजिक सहभागाला, त्यांच्या हक्कांना आणि विकासातील योगदानाला महत्त्व देत या दिवसाला विशेष स्थान दिले. जगभरातील युवकांना भेडसावणाऱ्या शिक्षण, रोजगार, गरिबी, असमानता, मानसिक ताण, सामाजिक बहिष्कार, हवामान बदल, डिजिटल परिवर्तन आणि शांतता-सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण ठरतो. युवकांना केवळ भविष्यातील नागरिक म्हणून पाहण्याऐवजी वर्तमानातील सक्रिय भागीदार म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मतांना स्थान देणे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

भारताच्या संदर्भात युवकांचे महत्त्व अधिक व्यापक आहे. देशाची मोठी लोकसंख्या तरुण आहे. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वांत मोठ्या युवा शक्तींपैकी एक शक्ती उपलब्ध आहे. ही लोकसंख्यात्मक स्थिती भारतासाठी मोठी संधी आहे; मात्र ती आपोआप विकासाचे साधन ठरत नाही. युवकांना दर्जेदार शिक्षण, बाजारपेठेला अनुरूप कौशल्ये, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली तरच ही लोकसंख्यात्मक संधी आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा बेरोजगारी, अपुरी रोजगारक्षमता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक निराशा या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच 'तरुण भारत' ही संकल्पना केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीपुरती मर्यादित न राहता सक्षम, सुशिक्षित, कुशल, संवेदनशील आणि जबाबदार भारताच्या निर्मितीशी जोडली पाहिजे.

युवकांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशील विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. आजच्या बदलत्या जगात पारंपरिक ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि उद्योजकता यांसारख्या कौशल्यांची गरज वाढत आहे. त्यामुळे युवकांना केवळ परीक्षाभिमुख शिक्षण देण्याऐवजी ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वय साधणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या समान संधी आणि ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल साधनांची उपलब्धता यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल.

आजच्या युवकांसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी रोजगाराचे आव्हान महत्त्वाचे आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. काही युवकांना रोजगार मिळतो; परंतु त्यांना त्यांच्या कौशल्यांच्या तुलनेत कमी उत्पन्न किंवा अस्थिर रोजगार स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीवरील वाढता आर्थिक दबाव, मर्यादित औद्योगिक संधी आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण तरुणांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, कृषीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुणाने सरकारी नोकरीचीच अपेक्षा करण्याऐवजी रोजगार निर्माण करणारा उद्योजक होण्याची संधीही समाजाने उपलब्ध करून दिली पाहिजे.

डिजिटल क्रांतीने युवकांसमोर अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आहेत. आज एका छोट्या गावातील युवकाला जगभरातील ज्ञानसंपदा काही क्षणांत उपलब्ध होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सेवा, स्वतंत्र व्यवसाय, मुक्त व्यावसायिक काम, सर्जनशील उद्योग आणि नवउद्योजकता यामुळे तरुणांसाठी नवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. परंतु डिजिटल साधनांचा वापर विवेकपूर्ण पद्धतीने करणेही तितकेच आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश, ऑनलाइन फसवणूक, अतिरेकी वापर आणि आभासी जगाचे वाढते आकर्षण यामुळे युवकांच्या विचारक्षमतेवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून डिजिटल साक्षरतेबरोबरच डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते जीवनाचा पर्याय नाही, हे युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

युवकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक सक्षमता यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. स्पर्धेचे वाढते स्वरूप, शैक्षणिक अपेक्षा, रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक दबाव, सामाजिक तुलना आणि समाजमाध्यमांमधून निर्माण होणारी कृत्रिम यशाची प्रतिमा यामुळे अनेक तरुणांवर मानसिक दबाव वाढत आहे. अपयशाला सामोरे जाण्याची क्षमता, स्वतःच्या भावनांची जाणीव, संवाद साधण्याची सवय आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत घेण्याची सकारात्मक वृत्ती युवकांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. कुटुंब, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या अडचणींकडे केवळ शिस्तीच्या किंवा यश-अयशाच्या चौकटीत न पाहता संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. मानसिकदृष्ट्या सक्षम युवकच आव्हानांचा सामना करून समाजाच्या विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो.

युवक आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. इतिहासात अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक तरुण क्रांतिकारक, समाजसुधारक आणि विचारवंत यांनी देशासाठी मोठे योगदान दिले. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अभ्यास केला असता तरुणाईच्या ऊर्जा आणि विचारशक्तीचे महत्त्व स्पष्ट होते. आजच्या काळातील युवकांनी इतिहासातील या प्रेरणांचा अर्थ केवळ गौरवकथांमध्ये शोधू नये, तर सामाजिक जबाबदारी, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान द्यावे.

लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रश्न विचारणे, सार्वजनिक धोरण समजून घेणे, सामाजिक समस्यांवर चर्चा करणे, कायद्याचा आदर करणे आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. युवकांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा अफवांच्या आधारावर मतनिर्मिती करण्याऐवजी संविधानिक मूल्ये, विवेक, तथ्य आणि सार्वजनिक हित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने लोकशाहीतील आपली भूमिका समजून घेतली, तर समाजातील ध्रुवीकरण कमी करून संवाद आणि सहकार्याची संस्कृती विकसित होऊ शकते.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुतेची मूल्ये दिली आहेत. युवकांनी या संविधानिक मूल्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न मानता जीवनमूल्य म्हणून स्वीकारले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, जातीय भेदभावाचा विरोध, वंचित घटकांबद्दल संवेदनशीलता, विविधतेचा आदर आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण या मूल्यांमधूनच आधुनिक भारताची निर्मिती होणार आहे. युवकांच्या विचारविश्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक नैतिकता रुजविणे ही कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

युवकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्टही पूर्ण होऊ शकत नाही. हवामान बदल, जलसंकट, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या भविष्यातील पिढ्यांवर सर्वाधिक परिणाम करणार आहेत. त्यामुळे युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणाईने पर्यावरणाच्या प्रश्नांकडे केवळ आंदोलनाच्या दृष्टीने न पाहता दैनंदिन जीवनातील सवयी बदलण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

ग्रामीण युवकांकडे विशेष लक्ष देणे ही आजची गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्षमता, श्रमशीलता आणि नवकल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे; मात्र त्यांना संधींची कमतरता भासते. आधुनिक शेती, कृषीप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, हस्तकला, ग्रामीण उद्योग, डिजिटल सेवा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. गावातील युवकांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या संधी मिळाल्या, तर ग्रामीण स्थलांतराचा दबाव कमी होऊ शकतो. ग्रामीण युवक हा केवळ रोजगाराचा शोध घेणारा घटक न राहता आपल्या गावाच्या विकासाचा नेतृत्वकर्ता बनू शकतो.

युवतींच्या सक्षमीकरणाशिवाय युवाशक्तीचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, आरोग्य, डिजिटल प्रवेश, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग या संधी युवतींना मिळणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान वाढवायचे असेल, तर मुलींच्या शिक्षणाला आणि त्यांच्या स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील युवतींसाठी विशेष कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षम झाल्या की कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

आजच्या युवकांसाठी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची गरज आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद, अधिकार किंवा प्रसिद्धी नव्हे. नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारणे, इतरांना सोबत घेणे, अडचणींवर उपाय शोधणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे. युवकांनी समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष सामाजिक कार्याला महत्त्व दिले पाहिजे. रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, साक्षरता, पर्यावरण संरक्षण, ग्रामविकास, सामाजिक समता आणि नागरिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांनी सहभाग घेतला तर समाजातील सकारात्मक शक्ती अधिक बळकट होईल.

युवकांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशाकडून संधी मिळाव्यात अशी अपेक्षा करताना देशासाठी आपले योगदान काय असू शकते, हा प्रश्नही प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रामाणिकपणे शिक्षण घेणे, कौशल्य आत्मसात करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे ही राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये नसून आपल्या दैनंदिन आचरणात दिसली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शासन, शिक्षणसंस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी युवकांकडे अधिक विश्वासाने पाहण्याची गरज आहे. युवकांना केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी ते समस्यांचे समाधान देऊ शकतात, असा दृष्टिकोन विकसित करावा लागेल. त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान, नवकल्पनांना प्रोत्साहन, संशोधनासाठी संधी, कौशल्यविकासासाठी साधने आणि उद्योजकतेसाठी आवश्यक आधार दिला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, डिजिटल साधनांनी सक्षम आणि डिजिटल सुविधांपासून वंचित अशा युवकांमधील दरी कमी करण्यासाठीही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.

आज भारतासमोर विकसित आणि समताधिष्ठित राष्ट्र घडविण्याचे मोठे स्वप्न आहे. हे स्वप्न केवळ शासनाच्या योजनांनी पूर्ण होणार नाही. त्यासाठी जागरूक, कुशल, सर्जनशील आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी युवक असतील. भारताची युवा शक्ती जर ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांशी जोडली गेली, तर देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळू शकते. मात्र त्यासाठी युवकांना संधी देण्याबरोबरच त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीही गरज आहे.

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा त्यामुळे केवळ उत्सवाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना कोणत्या संधी देत आहोत, त्यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने पाहत आहोत आणि त्यांच्या स्वप्नांना किती व्यापक आकाश देत आहोत, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. युवक ही राष्ट्राची केवळ भविष्यातील आशा नाही; ते वर्तमानातील परिवर्तनाचे सक्रिय शिल्पकार आहेत. त्यांच्या हातात ज्ञानाची शक्ती, विचारांची प्रगल्भता आणि तंत्रज्ञानाची साधने आहेत. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर सामाजिक विषमता कमी करता येईल, आर्थिक विकासाला चालना देता येईल आणि लोकशाही अधिक सक्षम करता येईल.

म्हणूनच आजच्या युवा पिढीसमोर एकच संदेश असायला हवा तो म्हणजे स्वप्ने मोठी पाहा, परंतु त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवा; तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, परंतु विवेक सोडू नका; यशाचा पाठपुरावा करा, परंतु मूल्यांचा त्याग करू नका; स्वतःच्या प्रगतीचा विचार करा, परंतु समाजाची जबाबदारी विसरू नका.

राष्ट्रनिर्मिती ही केवळ नेत्यांची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे सर्वाधिक सामर्थ्यवान वाहक म्हणजे युवक. म्हणूनच सक्षम युवक, समताधिष्ठित समाज आणि विकसित भारत ही तीन उद्दिष्टे परस्परांपासून वेगळी नसून एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. युवाशक्तीला योग्य दिशा, समान संधी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व मिळाले, तर भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग निश्चितच अधिक भक्कम होईल. आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हीच युवाशक्ती राष्ट्राच्या प्रगतीची नवी ऊर्जा ठरावी, हीच अपेक्षा.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# छत्रपती संभाजीनगर विमानतळावर तातडीने इमिग्रेशन चेकपोस्ट मंजूर करा

## आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी खासदार संदिपान भूमरेंची अमित शाहांकडे मागणी; गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे समर्थन

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) - मराठवाड्याच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर तातडीने 'इमिग्रेशन चेकपोस्ट' (ICP) घोषित करून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यास मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार संदिपान भूमरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली आहे. यावेळी शिवसेनेचे लोकसभेचे गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सुद्धा खासदार भुमरेच्या मागणीला समर्थन देऊन गृहमंत्री अमित शाह यांना विमानतळाची माहिती दिली.

यासंदर्भात खासदार भूमरे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र देऊन छत्रपती संभाजीनगर विमानतळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे. छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्याचे प्रमुख आर्थिक, औद्योगिक आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र असून, अजंठा-वेरूळ लेणी, देवगिरी किल्ला, बीबी का मकबरा यांसारख्या ऐतिहासिक आणि जागतिक पर्यटनस्थळांमुळे देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात. मात्र, थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवा उपलब्ध नसल्याने विदेशी पर्यटक, उद्योजक, गुंतवणूकदार आणि व्यावसायिकांना मुंबई अथवा दिल्लीमार्गे प्रवास करावा लागतो.

छत्रपती संभाजीनगर परिसरात ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स, खाद्यप्रक्रिया यांसह विविध औद्योगिक क्षेत्रांचा विस्तार होत असून विदेशी



गुंतवणुकीलाही मोठी संधी निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत थेट आंतरराष्ट्रीय हवाई संपर्क उपलब्ध झाल्यास उद्योग, व्यापार, पर्यटन आणि गुंतवणुकीला मोठी गती मिळू शकते, असे खासदार भूमरे यांनी पत्रात नमूद केले आहे.

**इमिग्रेशन तपासणीची प्रक्रिया पूर्ण -** छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असून ब्युरो ऑफ इमिग्रेशनकडून विमानतळाची पाहणी पूर्ण झाल्याचे खासदार भूमरे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यास इच्छुक असलेल्या विमान कंपन्यांसाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेत केंद्रीय गृह मंत्रालयाकडून इमिग्रेशन चेकपोस्ट (खउझ) ची अधिकृत मंजुरी महत्त्वाची असून, ही मंजुरी प्रलंबित असल्याने आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यास अडथळा निर्माण होत असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

**पर्यटनाला मोठी चालना मिळणार -** छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू झाल्यास मराठवाड्यातील पर्यटन क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. अजंठा-वेरूळसह ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनस्थळांना भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता असून, पर्यटनाशी संबंधित हॉटेल, वाहतूक, मार्गदर्शक, हस्तकला, खाद्यपदार्थ आणि सेवा क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील.

उद्योग-व्यापारासाठी थेट जागतिक कनेक्टिव्हिटी

मराठवाड्यातील उद्योगांना जागतिक बाजारपेठेशी थेट जोडण्यासाठी आंतरराष्ट्रीय हवाई संपर्क अत्यंत आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय विमानसेवेमुळे विदेशी गुंतवणूकदार, उद्योगपती, तज्ज्ञ आणि व्यावसायिकांना छत्रपती संभाजीनगरला येणे सुलभ होईल. त्यामुळे नवीन गुंतवणूक आकर्षित होऊन स्थानिक उद्योगांच्या विस्ताराला चालना मिळण्यास मदत होईल.

**मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा -** छत्रपती संभाजीनगर विमानतळावर इमिग्रेशन चेकपोस्ट सुरू करून आंतरराष्ट्रीय विमानसेवा उपलब्ध करून देणे ही केवळ विमानतळाची मागणी नसून संपूर्ण मराठवाड्याच्या आर्थिक विकासाशी निगडित महत्त्वाची गरज असल्याचे खासदार भूमरे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे केंद्रीय गृह मंत्रालयाने या विषयात तातडीने हस्तक्षेप करून छत्रपती संभाजीनगर विमानतळाला इमिग्रेशन चेकपोस्ट (ICP) म्हणून अधिकृत मान्यता द्यावी आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा करावा, अशी ठाम मागणी खासदार संदिपान भूमरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली आहे. आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू झाल्यास पर्यटन, उद्योग, व्यापार, गुंतवणूक, रोजगार आणि एकूणच मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला नवी झेप मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# श्री.श्री.१००८महामंडलेश्वर स्वामी परमानंद गिरीजी महाराजांना'चिंतातुर शेतकरी'कविता संग्रह भेट



वैजापूर, दि. १२ (प्रतिनिधी) - शेतकरी जीवनातील व्यथा, व समस्या यावरील ११२ कवितांचा संग्रह असलेले कविता संग्रह'चिंतातुर शेतकरी'पुस्तक मंगळवार (ता,११)रोजी संत श्रेष्ठ संत सावता महाराज यांच्या ७३१ व्या पुण्यतिथी निमित्त भांगसी माता गड चे श्री.श्री.१००८महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांना यासंग्रहाचे कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी भेट म्हणून दिला. संत सावता महाराज शेतीतील कष्ट व श्रम यातच विठ्ठल बघत असत.यांचे औचित्य साधत राजपूत यांनी आपला कविता संग्रह स्वामींना प्रदान केला.

# जैन इंजिनिअर्स सोसायटी SKALEUP iBIZ प्रतिसाद ब्लू फिनिक्स प्रथम; विर्रा इलेक्ट्रिक द्वितीय, तर माइंडस्पार्क एड्युटेक तृतीय

## जेसा छत्रपती संभाजीनगर व जेसा -छद यांच्या संयुक्त विद्यमाने युवा उद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमाचा यशस्वी समारोप



छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – जैन इंजिनिअर्स सोसायटी असोसिएशन जेसा छत्रपती संभाजीनगर) आणि जेसा -छद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित SKALEUP iBIZ 3.0 या नवउद्योजकता, नवकल्पना आणि उद्योगविकास उपक्रमाचा भव्य अंतिम सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी रुक्मिणी हॉल, एम जीएम कॅम्पस येथे उत्साहात पार पडला.

पहिल्या दोन पर्वांच्या यशानंतर आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या पर्वालाही नवउद्योजक, उद्योगविकास केंद्रे आणि उद्योग क्षेत्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अंतिम फेरीत आठ नवउद्योजक संस्थांनी आपल्या व्यवसाय संकल्पना, उत्पादने आणि नवकल्पनांचे सादरीकरण मान्यवर परीक्षकांसमोर केले.

**ब्लू फिनिक्स विजेता**

अंतिम सादरीकरण आणि परीक्षकांच्या मूल्यांकनानंतर ब्लू फिनिक्सने प्रथम क्रमांक पटकावला. विर्रा इलेक्ट्रिकने द्वितीय, तर माइंडस्पार्क एड्युटेकने तृतीय क्रमांक मिळिवला. विजेत्या नवउद्योजक संस्थांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

मान्यवर परीक्षकांमुळे कार्यक्रमाची उंची वाढली

SKALEUP iBIZ 3.0 च्या अंतिम फेरीसाठी विविध क्षेत्रांतील अनुभवी उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर परीक्षक उपस्थित होते.

परीक्षक मंडळामध्ये एर. राजेंद्र एस. जैन – संस्थापक अध्यक्ष, जेईएस फाउंडेशन; पवनकुमार पाटोदी – मुख्य कार्यकारी अधिकारी, आद्विक हायटेक; डॉ. आनंद देशपांडे – विभागप्रमुख, रक्तसंक्रमण वैद्यक विभाग, हिंदुजा रुग्णालय; ॲड. रोहित जैन – संचालक, ईएलपी; तसेच डॉ. वैभव तिडके – सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी, एस४एस टेक्नॉलॉजीज यांचा समावेश होता.

या मान्यवर परीक्षकांनी सहभागी नवउद्योजक संस्थांच्या व्यवसाय संकल्पना, नवकल्पना, व्यावसायिक क्षमता आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यतांचे मूल्यांकन केले.

कार्यक्रमाला गएड फाउंडेशनचे अध्यक्ष एर. महेंद्र पाहाडिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच गएड फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष एर. राजेंद्र एस. जैन यांची विशेष उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले.

SKALEUP - iBIZच्या प्रवासातील सातत्यपूर्ण साथीदार

SKALEUP हे SKALEUP iBIZचे प्रमुख प्रायोजक असून, iBIZच्या पहिल्या दोन पर्वांनाही SKALEUPने प्रमुख प्रायोजक म्हणून भक्कम पाठिंबा दिला होता. सलग तिसऱ्या पर्वातही SKALEUPने या उपक्रमासोबत आपली भागीदारी कायम ठेवत युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या JESAच्या प्रयत्नांना बळ दि सहकार्यामुळे iBIZ हा केवळ एक कार्यक्रम न राहता नवउद्योजकांसाठी विश्वासार्ह आणि प्रभावी व्यासपीठ म्हणून विकसित होत आहे. युवा उद्योजकांना संधी, मार्गदर्शन आणि उद्योग क्षेत्राशी जोडण्याच्या या उपक्रमात SKALEUPची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

**उद्योगविकास केंद्रांचाही गौरव**

नवउद्योजक संस्थांच्या विकासात उद्योगविकास केंद्रांची भूमिका महत्त्वाची असल्याने SKALEUP iBIZ 3.0 मध्ये उत्कृष्ट उद्योगविकास केंद्रांचाही गौरव करण्यात आला.

MAGIC – मराठवाडा विकास व उद्योगविकास परिषद यांना सर्वोत्कृष्ट उद्योगविकास केंद्र पुरस्कार देण्यात आला, तर Anand Innovation & Incubation Council यांना उपविजेता म्हणून गौरविण्यात आले.

या सन्मानातून नवउद्योजकांना मार्गदर्शन, प्रशिक्षण, व्यवसायविकास आणि आवश्यक उद्योगविषयक वातावरण उपलब्ध करून देणाऱ्या उद्योगविकास केंद्रांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

प्रमुख मान्यवर व जेसा नेतृत्वाची उपस्थिती कार्यक्रमाला एर. प्रद्युम्न शाह – अध्यक्ष, जेसा मयूर पाटनी – सचिव, पंकज सुराणा – कोषाध्यक्ष, तसेच दीपेश कंकरीया – अध्यक्ष, जैसा -छद यांच्यासह JESA व गएड फाउंडेशनचे अनेक पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

**एक स्पर्धा नव्हे, तर उद्योजकांसाठी व्यासपीठ** – SKALEUP iBIZ 3.0च्या माध्यमातून नवउद्योजकांना केवळ स्पर्धेची संधी न देता मार्गदर्शन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी संपर्क, व्यावसायिक संबंध प्रस्थापित करण्याच्या संधी आणि व्यवसायवाढीसाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमाचे सादरीकरण प्रकल्प संयोजक सुनील सेठी आणि सहप्रकल्प संयोजक दिनेश मुथा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहप्रकल्प संयोजक प्रसाद जैन आणि सुदर्शन कटारिया यांच्यासह JESA आणि JESA-NXच्या संपूर्ण टीमने विशेष मेहनत घेतली.

जेसा चे सचिव मयूर पाटनी यांनी सांगितले, "SKALEUP iBIZ हा केवळ नवउद्योजकता स्पर्धेपुरता मर्यादित नसून युवा उद्योजकांना मार्गदर्शन, व्यावसायिक संबंध आणि उद्योग क्षेत्राशी जोडणारे व्यासपीठ आहे. छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्यातील उद्योजकतेला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमात सहभागी सर्व नवउद्योजक संस्था, उद्योगविकास केंद्रे, परीक्षक, मार्गदर्शक, SKALEUP, मान्यवर, स्वयंसेवक आणि माध्यम प्रतिनिधींचे जैसा व जैसा -छद यांच्या वतीने आभार मानण्यात आले.

SKALEUP iBIZ 3.0च्या यशस्वी आयोजनामुळे छत्रपती संभाजीनगरच्या वाढत्या नवउद्योजकता आणि उद्योग क्षेत्राला आणखी एक नवी दिशा मिळाली असून, भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा जैसा व जेसा -छदचा मानस आहे.

SKALEUP iBIZ 3.0 – प्रमुख निकाल
नवउद्योजक श्रेणी
प्रथम – ब्लू फिनिक्स
द्वितीय – विर्रा इलेक्ट्रिक
तृतीय – माइंडस्पार्क एड्युटेक
उद्योगविकास केंद्र श्रेणी
सर्वोत्कृष्ट उद्योगविकास केंद्र – मॅजिक
उपविजेता – आनद Innovation & Incubation Council, आयोजक: जेसा, छत्रपती संभाजीनगर व जेसा -छद, प्रमुख प्रायोजक: SKALEUP, पर्व: तिसरे, अंतिम फेरीतील नवउद्योजक संस्था: ८ हे होते.

# आंतरराष्ट्रीय युवा दिना निमित्त वैजापूरात १२ ऑगस्ट रोजी भव्य युवा जागृती फेरी





वैजापूर, दि. १२ (प्रतिनिधी) – आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त बुधवार (ता १२) रोजी शहरातील युवक, तसेच वैद्यकीय महाविद्यालय विद्यार्थी, आनंद नर्सिंग कॉलेज, कदम नर्सिंग कॉलेज, न्यू हायस्कूल च्या विद्यार्थ्यांची शहरातून भव्य जनजागृती फेरी काढून युवा वर्गाला एचआयव्हीएड्स बाबत तसेच व्यसन व विकारपासून दूर राहण्याचा संकल्प करून शपथ देण्यात आली. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रक पथक, छत्रपती संभाजीनगर व उप जिल्हा रुग्णालय वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ही फेरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून आरंभ करण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर, डॉ संजय पवार, यांच्या प्रेरणेने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन झाल्यानंतर नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, जिल्हा प्रमुख बाबासाहेब जगताप, तालुका प्रमुख राजेंद्र पा.साळुंके पारस घाटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरविंद हरबडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपमाला परदेशी, डॉ.अरविंद धाबे तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे, समाजसेवक तथा जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपुत, नायब तहसीलदार रामेश्वर महाजन, महेश बुणगे, रणजित चव्हाण, कमलेश आंबेकर, अमोल बोरनारे, संदीप राजपुत यांनी फेरीला हिरवा ध्वज दाखविला 'युवा शक्ती-देश की शक्ती 'युवक सशक्त -तर -देश सशक्त' संयम पाळा-एड्स टाळा' व्यसनापासून रहा दूर- आजार पळवू भुर, भुर, 'व्यसन त्यागू-रोग पळवू' अशा घोषणा देत ही फेरी शहराच्या विवीध भागातून नेऊन युवा जागृती करण्यातआली.व शेवटी वसंत क्लब मैदानावर युवकांना साधना गंगावणे यांनी शपथ देऊन संकल्प सोडला. या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे, किसन चौधरी, विजय पाटील, किरण चौधरी, मयूर ठोंबरे, साईनाथ बारगळ, बापू वाळके, शशिकांत पाटील, किशोर वाघुले, सुनील माने, विशाल पडवळ, सुरेश लोखंडे. नर्सेस माया महाडकर, रुख्मिनी गवई, छाया केदारे, विजया जंगम, कल्पकता जाधव, मनीषा मुळे यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी सहभाग नोंदविला. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले आभार विजय पाटील यांनी मानले.

# 'आत्मा' तर्फे आज (दि.१३) रानभाजी महोत्सव

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – रानभाज्यांची ओळख व्हावी, त्यांच्या पौष्टिक व औषधी गुणधर्मांविषयी जनजागृती व पाककृतींचे संवर्धन व्हावे यासाठी कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि कृषि विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १३ रोजी 'रानभाजी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे हा महोत्सव होणार असून त्यामध्ये वैयक्तिक महिला, महिला बचत गट तसेच शेतकरी गट सहभागी होणार आहेत. महोत्सवात विविध प्रकारच्या रानभाज्यांचे नमुने आणि त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या पारंपरिक पाककृतींचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

**मुबलक रानभाज्यांची उपलब्धता** – या महोत्सवात करटोली, घोळ, आंबुशी, कुडू, केना, सुरण, दिंडा, कुडा, टाकळा, पाथरी, भुईआवळी, कपाळफोडी, तरोटा, आघाडा, उंबर, चिगूर, सराटे, मायाळू आदी विविध रानभाज्यांची उपलब्धता असेल.

**रानभाज्य पौष्टिक आणि औषधी** – रानभाज्या प्रामुख्याने नैसर्गिकरीत्या उगवत असल्याने त्यांच्यावर रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर होत नाही. या भाज्या चविष्ट आणि आरोग्यदायी असून अनेक रानभाज्यांमध्ये विविध पौष्टिक व औषधी गुणधर्मही आढळतात. ऋतुमानानुसार आहारामध्ये विविधता आणण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो. त्यामुळे नागरिकांना रानभाज्यांची ओळख करून देणे, त्यांच्या पारंपरिक पाककृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे.

**शेतकऱ्यांना सहभागाचे आवाहन**– महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकरी, महिला, महिला बचत गट आणि शेतकरी गटांनी आपल्याकडील विविध रानभाज्यांचे नमुने व त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या पाककृतींच्या माहितीसह गुरुवार दि. १३ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित राहावे. तसेच शेतकरी, महिला बचत गट व नागरिकांनी या रानभाजी महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकल्प संचालक (आत्मा) डी. ए. जाधव, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) डॉ. ए. के. पडिले तसेच कृषि विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर व गांधेलीच्या कार्यक्रम समन्वयक डॉ. दीप्ती पडगावकर यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'रेड रन' स्पर्धा उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयीजनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक आणि क्रीडा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'रेड रन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत युवक व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यापीठाच्या क्रीडा विभागापासून सकाळी सात वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव डॉ. सलामपुरे यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेचा शुभारंभ केला. क्रीडा विभागापासून विद्यापीठ प्रवेशद्वार, लिटल फ्लॉवर स्कूल चौक आणि तेथून पुन्हा क्रीडा विभाग असा स्पर्धेचा मार्ग होता.

रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. शिल्पा जिवरग, सतीश पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे, जिल्हा पर्यवेक्षक संजय पवार तसेच सीपीओ सरिता विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

**युवक गटातील विजेते** – रेड रन स्पर्धेच्या युवक गटात संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड येथील अतुल गोकूळ जाधव यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शेख खाकान अहमद यांनी द्वितीय, तर नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील आकाश चव्हाण यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

**युवती गटातील विजेत्या** – युवती गटात पंडित नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील मनीषा पाडवी यांनी प्रथम क्रमांक मिळिवला. बाभूळगाव येथील जयश्री बाळू नरोडे यांनी द्वितीय, तर दिपाली गणेश आगवणे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनाही सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांना एचआयव्ही/एड्स प्रतिबंध व जनजागृतीच्या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याची शपथ देण्यात आली. तसेच एचआयव्ही/एड्स जनजागृतीविषयक पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले व माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्याचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन सुनील नवले यांनी केले. प्रास्ताविक साधना गंगावणे यांनी केले, तर जिल्हा पर्यवेक्षक संजय पवार यांनी आभार मानले.

# महाराष्ट्रात राक्षसांचं राज्य आलंय ! ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांचा उद्वेग

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – पुण्यातील धनकवडी येथील जमिनीच्या टीडीआर हक्कांवरून ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांनी महायुती सरकारवर हल्ला चढवला. 'न्यायालयाने निकाल देऊनही हक्काचा टीडीआर आम्हाला दिला जात नाही. मंत्रालयातून विनाकारण त्रास दिला जात आहे, असा आरोप करतानाच, महाराष्ट्रात राक्षसांचं राज्य असल्यासारखं वाटतंय,' असा उद्वेग त्यांनी इन्स्टाग्राम वरील पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केला.

धनकवडी येथे उषा चव्हाण यांच्या कुटुंबाची जमीन आहे. त्या जमिनीच्या टीडीआरचा वाद २६ वर्षे न्यायालयात होता. या प्रकरणात मार्च २०२६ मध्ये उच्च न्यायालयाने निर्णय दिला. न्यायालयाने उषा चव्हाण यांचा मुलगा हृदयनाथ यांचा मालमत्तेत कायदेशीर हिस्सा असल्याचे मान्य केले. त्यानंतरही पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी चव्हाण यांच्या हक्काचा टीडीआर एका खासगी बिल्डरला चुकीच्या पद्धतीने मंजूर केल्याचा त्यांचा आरोप आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला न्याय देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र काहीही झालेले नाही, असा त्रागा त्यांनी व्यक्त केला.

**मराठी माणसाच्या कष्टाचं परप्रांतीयांना का देताय?**

'दोन्ही पक्षांनी एकत्र बसून वाद सोडवावा असे न्यायालयाने सांगितले होते. यात महापालिकेचा संबंध नव्हता. मात्र पुणे महापालिकेने परस्पर माझ्या हिश्शाचा टीडीआर एका परप्रांतीयाला देऊन टाकला. त्यांना हा अधिकार कुणी दिला? हा काय दुष्टपणा चालवलाय, ही मोघलाई आहे का, याच्या मागे कोण आहे,' असा सवाल उषा चव्हाण यांनी केला. 'मराठी माणसाच्या कष्टाचे परप्रांतीयांना दिले जात आहे. सगळे काही परप्रांतीयांना देऊन मराठी माणसाला झोपवायचे ठरवले आहे का? मी ते होऊ देणार नाही,' असा इशाराही त्यांनी दिला. 'मी माझ्या हक्काच्या गोष्टीसाठी भांडते आहे. बेकायदेशीर काही असते तर मी पुढे गेलेच नसते,' असेही त्या म्हणाल्या.

# संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१व्या पुण्यतिथीनिमित्त वैजापूरात विविध कार्यक्रम उत्साहात



वैजापूर, दि. १२ (प्रतिनिधी) – संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१व्या पुण्यतिथी निमित्त व संत नामदेव महाराज यांच्याही पुण्यतिथी निमित्त समस्त माळी समाज वैजापूर यांच्या वतीने माळी गल्ली येथील सावता महाराज मंदिरात व आनंद नगर येथील सावता महाराज मंदिरात गेल्या पांच ऑगस्ट पासून काकडा, हरिपाठ, प्रवचन व कीर्तन असे विविध कार्यक्रम संपन्न होऊन बुधवार(ता,१२) रोजी हभप शतानंदगिरीजी महाराज(गणपती मंदिर शिवराई) यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता समारोह आनंदनगर येथे उत्साहात सम्पन्न झाला.

या प्रसंगी संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची भव्य शोभा मिरवणूक माळी गल्ली येथून काढून आनंदनगर येथे नेण्यात आली. या प्रसंगी तालुक्याचे आ.प्रा.रमेश पा. बोरनारे, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई दिनेश भाऊ परदेशी, हभप ढंगारे महाराज, उपनगराध्यक्ष रियाज शेख, अकिल शेख, नगरसेवक विशाल संचेती, स्वप्नील जेजुरकर, जि.प.सदस्य श्रीराम गायकवाड, माजी नगर सेवक रमेश हाडोळे, ज्ञानेश्वर टेके, माधुरी बनकर, मंदा गायकवाड, शोभाबाई भुजबळ, समाज कार्यकर्ते ठा.धोंडीरामसिंह राजपूत, यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यकर्माचे आयोजक सजन गायकवाड (पहेलवान) तसेच सरपंच दौलत गायकवाड, रतीलाल गायकवाड, मेजर गौतम अशोक गायकवाड, दिलीप गायकवाड, तुकाराम गायकवाड, दिलीप देवकर, संजय भावलाल, श्रीकांत गायकवाड, उत्तम आहेर, अशोक बनकर श्री. राशींनकर, निवृत्ती गायकवाड, भगवान देवकर, विकास गायकवाड, मचिंद्र गायकवाड, अशोक देवकर, सुनील गायकवाड, फकिरा आहेर, अशोक पवार खंडाळकर, राजेंद्र जानराव तसेच सीता मावशी गायकवाड, कमळा आजी गायकवाड, सुमनबाई गायकवाड, मनीषा गायकवाड, जिजाबाई गायकवाड यांनी व समस्त माळी समाज महिला, पुरुष युवक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रम सूत्र संचलन धोंडीराम सिंह ठाकूर यांनी केले आभार गौतम गायकवाड व दौलत गायकवाड यांनी मानले.

# कचनेर येथे भगवान श्री चिंतामणी पार्श्वनाथांचा महामस्तकाभिषेक उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – छत्रपती सभाजीनगर श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्रावर महामस्तकाभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ठोले परीवाराचा वतीने सकाळी श्री १००८ चिंतामणि पार्श्वनाथ भगवंतांना १००८ नारळ अर्पण करून सामूहिक पूजनाने सोहळ्याची सुरुवात झाली.

यानंतर बोलीचा कार्यक्रम पार पडला. इंद्र-इंद्राणींच्या हस्ते भगवान श्री चिंतामणी पार्श्वनाथांचा पंचामृत महामस्तकाभिषेक करण्यात आला. इंद्र-इंद्राणी व शांतीधारेचा मान लासूर स्टेशन येथील सुभाषचंद आशिषकुमार रियांशकुमार ठोळे परिवाराला मिळाला. दुध अभिषेक सौ रिंकु भुषणकुमार कासलीवाल मिळाला. अभिषेक सोहळ्यानंतर सुभाषचंद आशीषकुमार रियांशकुमार, सौ शोभाबाई सुभाष ठोले, सौ नूतन आशिषकुमार ठोले, कु रिशु, चि रियांश ठोळे परिवार लासूर वाले याचा वतीने भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमाला चादवडचे नगराध्यक्ष भुषणकुमार जयचद कासलीवाल याचासह समाजबाधव कचनेर विश्वस्त मडळ व कार्यकारीनी मडळ उपस्थिती होती.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात संभाजीनगरात मोर्चा

## 'जय भीम'च्या घोषणांनी क्रांती चौक दणाणला, हजारो सहभागी




छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात बुधवारी भव्य मोर्चा काढण्यात आला. क्रांती चौकातून सुरू झालेल्या या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते. आरक्षणातील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला.

या महामोर्चात केवळ पुरुषच नव्हे, तर महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात निळे झेंडे, फलक आणि उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीचे बॅनर घेतले होते. 'जय भीम'च्या घोषणांनी क्रांती चौक परिसर दुमदुमून गेला होता.

क्रांती चौकातून निघालेला हा मोर्चा पैठण गेट, गुलमंडी, सिटी चौक आणि किल्लेअर्क मार्गे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहोचला. आंदोलकांनी शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा काढला.

मोर्चातील प्रचंड गर्दी आणि उत्साह पाहता, पोलीस प्रशासनाने सुरक्षेसाठी चोख बंदोबस्त तैनात केला होता. प्रमुख मार्गांवर वाहतुकीत बदल करण्यात आले होते, जेणेकरून कायदा व सुव्यवस्था राखली जाईल.

# ग्रामपंचायतींनी घनकचरा व्यवस्थापनात पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- आपल्या गावातील कचरा ही सर्वांची जबाबदारी आहे. कचरा संकलित करून त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे या कामी ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय जी.सी गौडा यांनी केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत अधिसूचित घन कचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या वतीने आज जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शेजारील भानुदास चव्हाण सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणासाठी शहरालगतचे औद्योगिक क्षेत्र, ऐतिहासिक स्थळ, खाम नदीवरील ग्रामपंचायती अशा एकूण ५८ ग्रामपंचायत मधील सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासक सहभागी झाले होते. प्रशिक्षणाचे उद्घघाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या हस्ते झाल. समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम, सह आयुक्त नगर विकास सौरभ जोशी, मनपा उप आयुक्त (घनकचरा)




नंदकुमार भोबे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोकणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक जल जीवन मिशन डॉ ओमप्रसाद रामावत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची अंलबजावणी प्रभावीपणे व गांभीर्यपूर्वक होणे आवश्यक आहे. त्याचा संबंध थेट ग्रामस्थांचे आरोग्य, गावाचे वातावरण, सार्वजनिक स्त्रोतांचे संरक्षण यांच्याशी आहे. अंलबजावणी, कारवाई व घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन करावे यासाठी सीएसआर निधीचा वापर करावा, असे मार्गदर्शनात जिल्हाधिकारी गौडा यांनी नमूद केले.

शहरालगतच्या ग्रामपंचायती मध्ये शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होत आहे यासाठी नियमितपणे कचरा संकलन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांनी सांगितले की, श्रावण महिन्यात वेरूळ घृष्णेश्वर मंदिर परिसराची नियमित साफसफाई करावी. ऐतिहासिक स्थळ असलेल्या ग्रामपंचायतीने मुख्य रस्त्यावर कमानी उभाराव्यात व स्थळाची मोठ्या प्रमाणात प्रचार प्रसिद्धी करावी. ग्रामपंचायत मध्ये दंड वसुली करिता माजी सैनिक किंवा खाजगी एजन्सीवर जबाबदारी सोपवावी. येत्या १५ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापन २०२६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभेत विषय घ्यावा, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांनी मार्गदर्शनात सांगितले.

दुसऱ्या सत्रात मनपा उप आयुक्त घनकचरा नंदकुमार भोबें, सहआयुक्त नगर विकास सौरभ जोशी यांनी घनकचरा विषयी मार्गदर्शन केले. यानंतर प्रशिक्षणार्थींना रमानगर स्मशानभूमी येथील घनकचरा संकलन केंद्रात भेट देऊन माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणाला इको सत्वाच्या प्रियंका वझे, सहाय्यक गट विकास अधिकारी पंचायत साहेबराव चव्हाण, गट विकास अधिकारी पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर शिवाजी साळुंके, विस्ताराधिकारी प्रकाश तुपे, राधाकृष्ण चौधरी, ग्रामसेवक संघटनेचे प्रवीण नलवडे, ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच उपस्थित होते.

# एकाच छताखाली भारताची रंगीबेरंगी कारागिरी; १४ ऑगस्टपासून स्वदेशी एक्स्पोचा जल्लोष

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- ओडिशाची पट्टचित्र कला, राजस्थानची पिचवाई, झारखंडची सोहराय, बिहारची मधुबनी, उत्तराखंडची ऐपण व महाराष्ट्राची पैठणी अशा देशाच्या विविध भागांतील पारंपरिक कलांचा रंगीबेरंगी आविष्कार छत्रपती संभाजीनगरात एकाच छताखाली अनुभवता येणार आहे. १४ ते १६ ऑगस्टदरम्यान सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या स्वदेशी फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पोमध्ये देशभरातील सुमारे ७५ प्रदर्शक सहभागी होत असून त्यापैकी सुमारे ८० टक्के महिला उद्योजक व लघुउद्योजक आहेत.

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने शिखाज कारागीरी संस्थेच्या समन्वयातून होणाऱ्या या एक्स्पोला राष्ट्रीय ताग मंडळाचे सहकार्य लाभले आहे. ट्रायफेडमार्फत सहा आदिवासी कलाकार, ओडिशातील पट्टचित्र कलेचे चार, राजस्थानातील पिचवाईचा एक, झारखंडमधील सोहरायचे दोन, बिहारमधील मधुबनीचे दोन व उत्तराखंडमधील ऐपण कलेचे चार कलाकार सहभागी होणार आहेत. पैठणीचे दोन प्रदर्शकही सहभागी होतील.

१५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० ते ७ वाजता एमजीएम स्कूल ऑफ फॅशन डिझाईनच्या वतीने फॅशन शो होणार असून विद्यार्थी व मॉडेल्सचे दोन संच व छत्रपती संभाजीनगरातील महिलांचा तिसरा संच सादर होईल. मुलांसाठी विविध कार्यशाळा व टॅलेंट हंट, गणेशहार व आसन निर्मिती व लोकर रांगोळी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. पुण्याहून आलेले कॅरिकेचर कलाकार तिन्ही दिवस उपस्थित राहतील. दररोज सायंकाळी ७.३० ते रात्री ९ वाजेपर्यंत लाईव्ह म्युझिकचे आयोजन करण्यात आले आहे.

रील मेकिंग व सेल्फी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात येणार असून @fashionlifestyleExpo या Instagram खात्याला टॅग करणे आवश्यक आहे. ५ हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉमध्ये सहभागी होता येणार असून १६ ऑगस्ट रोजी विजेत्याला 'स्वदेशी गिफ्ट हॅम्पर' देण्यात येईल. केंद्रीय युवा कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता एक्स्पोला भेट देऊन कलाकार, कारागीर व पुरस्कार विजेत्यांचा सत्कार करणार आहेत. उद्योग व कॉर्पोरेट संस्थांनी स्वदेशी एक्स्पोमधून दिवाळी व अन्य प्रसंगी भेटवस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने आपल्या सदस्यांमध्ये एक्स्पोची प्रसिद्धी करून सहकार्य केले आहे. मराठवाड्यातील नागरिकांनी या एक्स्पोला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'हर घर तिरंगा' अभियानात नागरिकांनी सहभाग घ्यावा; जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- 'हर घर तिरंगा' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी दि.९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत आपल्या घरावर तिरंगा ध्वज उभारावा. तिरंगा अभिमानाने फडकवून स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना व वीर जवानांना अभिवादन करूया. तसेच harghartiranga.com येथे तिरंगा ध्वजासोबत सेल्फी अपलोड करून या राष्ट्रीय अभियानात आपला सहभाग नोंदवू या,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

# तीन दिवसीय 'स्वदेशी फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पो २०२६'ची जय्यत तयारी

## देशभरातील कारागीर, उद्योजक व स्वदेशी उत्पादनांचा रंगणार सोहळा

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने व 'शिखाज कारागिरी' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान तीन दिवसीय 'स्वदेशी फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पो २०२६' या हस्तकला मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे.



सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या या प्रदर्शनासाठी देशभरातील स्वदेशी उत्पादने, हस्तकला, हातमाग, फॅशन व लाईफस्टाईल वस्तूंचे स्टॉल उभारण्यात येत आहेत. स्टॉल धारकांसाठी मंडप, वीज व्यवस्था व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी करण्यात येत आहे.

या प्रदर्शनात देशातील विविध राज्यांतील पुरस्कारप्राप्त कुशल कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकला व हातमागाच्या वस्तू तसेच महिला उद्योजकांची विविध स्वदेशी उत्पादने नागरिकांना खरेदीसाठी उपलब्ध होणार आहेत. मराठवाड्यातील नागरिकांनी सागर रिसॉर्ट्स येथे भेट देऊन स्वदेशी उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ रोटरी सदस्य अशोक तोष्णीवाल यांचा सन्मान; 'सर्वोत्कृष्ट रोटेरियन' पुरस्कार प्रदान, चार दशकांच्या उल्लेखनीय समाजसेवेची दखल

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- समाजसेवा आणि उत्कृष्ट नेतृत्वाचा आदर्श वस्तुपाठ घालून देणारे येथील ज्येष्ठ रोटरी सदस्य रो. अशोक तोष्णीवाल यांना रोटरी जिल्हा ३१३२ च्या २०२५-२६ या वर्षाचा अत्यंत मानाचा 'सर्वोत्कृष्ट रोटेरियन' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे.

संपूर्ण मराठवाडा विभाग, अहिल्यानगर, सोलापूर आणि सातारा अशा ११ महसूल जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या रोटरी जिल्ह्यात १०४ हून अधिक क्लब्स आणि ४ हजारांहून अधिक सदस्य कार्यरत आहेत. या हजारो सदस्यांमधून आपल्या अविरत आणि उल्लेखनीय कार्याच्या जोरावर रो. अशोक तोष्णीवाल यांनी हा सर्वोच्च सन्मान पटकावला आहे.

रोटरी क्लब छत्रपती संभाजीनगर पूर्वचे संस्थापक सदस्य असलेले रो. अशोक तोष्णीवाल हे रोटरी परिवारातील एक मार्गदर्शक स्तंभ म्हणून ओळखले जातात. ते 'मल्टीपल पीएचएफ' चे दाते आहेत. आपल्या चार दशकांच्या दीर्घ प्रवासात त्यांनी रोटरीमध्ये अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या कॅम्पसमध्ये चेक डॅम आणि पर्यावरण संवर्धन प्रकल्प उभारण्यात रो. तोष्णीवाल यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. या प्रकल्पासाठी त्यांनी ऑस्ट्रेलियातील एका रोटरी क्लबकडून मोठ्या रकमेचे अनुदान (ग्लोबल ग्रांट) मिळवून दिले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे आणि इतर रोटेरियन सहकाऱ्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प जागतिक पातळीवर विशेष मानांकित ठरला.

# तिरंगा सेल्फी काढून देशभक्तीचा उत्सव साजरा करा-आयुक्त अमोल येडगे

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा अभियान २०२६' राबविण्यात येत असून, या अभियानात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, अभिमान आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवावा तसेच आपल्या कुटुंबीयांसह तिरंग्यासोबत सेल्फी काढून ती अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे. हर घर तिरंगा अभियानाच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना तिरंग्यासोबत काढलेली सेल्फी अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच इच्छुक नागरिकांना या अभियानात स्वयंसेवक म्हणून नोंदणी करता येणार आहे. तिरंग्यासोबत सेल्फी काढा आणि अभियानात सहभागी व्हा! https://harghartiranga.com/ 'प्रत्येक घरात तिरंगा आणि प्रत्येक मनात राष्ट्राभिमान' या भावनेतून नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून तिरंग्यासोबतची आपली सेल्फी मोठ्या संख्येने अपलोड करावी आणि 'हर घर तिरंगा अभियान २०२६' यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन येडगे यांनी केले आहे.

(पान १ वरुन)

## पक्ष आणि चिन्हाबाबत निष्कर्ष..

पदाधिकारी किंवा पत्ता यामध्ये काही बदल झाल्यास त्याची माहिती निवडणूक आयोगाला देणे आवश्यक असते. आम्ही नेमके तेच केले. आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहून पदाधिकाऱ्यांची नावे कळवली होती. मात्र आता यावरून अनावश्यक वाद निर्माण केला जात आहे. आयोगाला पाठवलेल्या पत्रव्यवहारात शिवसेना पक्षप्रमुख असाच उल्लेख करण्यात आला होता. कायद्यानुसार जी माहिती देणे अपेक्षित असते ती आम्ही दिली. परंतु २०१८ च्या सुधारित पक्ष घटनेची माहिती नाही असं निवडणूक आयोग सोयीने म्हणत आहे. उपनेत्यांची नामांकन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली होती असं निवडणूक आयोग म्हणते, परंतु प्रत्यक्षात ती निवड इलेक्शनने झाली होती. आयोगाने कोर्टात सादर केलेली कागदपत्रे योग्य प्रकारे तपासली नाहीत असा आरोप कपिल सिब्बल यांनी सुप्रीम कोर्टात केला.

दरम्यान, ४ एप्रिल २०१८ ही तारीख लक्षात घ्या, कागदपत्रे थेट उपनिवडणूक आयुक्तांकडे सादर करण्यात आली होती. त्यावर निवडणूक आयोगाचा शिक्काही आहे. यात १२ उपनेत्यांची नियुक्ती करण्यात आली होती आणि २१ जण निवडून आले होते. शिवसेना पक्षात संघटना महत्त्वाची होती. नेते, उपनेते, सचिव यांच्यासह सर्व संघटना ठाकरेंकडेच होती. पक्षाची घटना आम्ही आयोगाकडे सादर केली होती असं कपिल सिब्बल यांनी कोर्टाला सांगितले.

## मुंबईतील घाटकोपरमध्ये दरड...

केलं जाईल. अशी देखील माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तर या पूर्वीच तिथे राहणाऱ्या लोकांना तो परिसर धोकादायक असल्याने नोटीसा बजावल्या होत्या. असे देखील सांगण्यात आलं आहे. तर यावर बोलताना महापौर रितू तावडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितलं की, साकीनाका येथील घटना अंत्यत दुर्दैवी आहे. या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना आपण ३ लाखांची मदत जाहिर केलेली आहे. मात्र अंत्यत चिंचोळ्या गल्या आहेत. घटनास्थळी मशीन पोहचू शकत नसल्याने मनुष्यबळाचा वापर करूनच मदत करावी लागणार आहे. अजून काही लोकं अडकली असून मदतकार्य आणखी काही तास सुरू राहिल. या धोकादायक ठिकाणी घरांची नोटीसा देण्यात आल्या होत्या. मात्र लोकं त्यांचं पालन करत नाहीत. असे त्या म्हणाल्या.

## महाराष्ट्रातील विद्यार्थी,...

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच जंतर-मंतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे निर्देश दिले होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले होते. आता गृह विभागाच्या निर्णयामुळे त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

याआधी मराठा आंदोलनासारख्या सामाजिक आणि राजकीय आंदोलनांमुळे दाखल झालेल्या गुन्ह्यांकरिता हा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठीची मुदत जुलै २०२६पर्यंत होती. या मुदतीपर्यंत आरोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र ही मुदत संपल्याने पुढील प्रकरणांबाबत संभ्रम निर्माण झाला होता. आता हा कालावधी थेट ३१ मार्च २०२७पर्यंत वाढविण्यात आला आहे.

## संसदेत सर्व प्रश्नांची उत्तरे देणार;...

मुद्यावरच नव्हे, तर विरोधी पक्षाची चर्चा करण्याची इच्छा का नाही, या कारणांवरही चर्चा करण्यास सरकार तयार आहे.

राहुल म्हणाले, 'विद्यार्थ्यांवर गोळ्या कोणी चालवल्या? खिळे लावलेल्या काठ्यांनी विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचे आदेश कोणी दिले? आमच्या मुलांवर गोळ्या झाडण्याचे आदेश अमित शहा यांनी दिले होते का? त्यांनी तसे केले असेल, तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे.

त्यांच्या घराबाहेर हजारो पोलीस कर्मचारी पहारा देत असतात. कोणताही विद्यार्थी त्यांच्या जवळ येऊ नये यासाठी ३० गाड्यांचा ताफा त्यांच्यासोबत असतो. अमित शहा गेल्या २० दिवसांपासून गायब आहेत. गृहमंत्र्यांमध्ये हिंमत नाही. ते संसदेतही येऊ शकत नाहीत.'

## व्यावसायिक वाहनचालकांना...

मर्यादित नसून सुधारित नियमांनुसार संबंधित परवानाधारकाकडेही व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच ॲप-आधारित मोटार कॅबच्या परवान्याचे नूतनीकरण करतानाही परवानाधारकाला मराठीचे समाधानकारक ज्ञान असल्याचे संबंधित प्राधिकरणाला पटवून द्यावे लागणार आहे.

या सुधारणांना 'महाराष्ट्र मोटार वाहन कायदा-२०२६' म्हणणे योग्य नसून, हे 'महाराष्ट्र मोटार वाहन (सुधारणा) नियम, २०२६' आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ अंतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये हे बदल करण्यात आले आहेत. यापूर्वी मराठी भाषेच्या ज्ञानाबाबत नियमांमध्ये काही संदिग्धता असल्याने त्याचा आधार घेत काही चालक या अटीचे पालन करीत नसल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे नियमांमधील संदिग्धता दूर करून व्यावहारिक मराठीची अट अधिक स्पष्ट करण्यात आली आहे.

## भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी...

अडचणी, मते आणि सूचना सविस्तरपणे जाणून घेतल्यानंतर, त्याच आधारावर भविष्यातील परीक्षा प्रणालीसाठी राज्याचे एक समग्र आणि सर्वसमावेशक धोरण निश्चित केले जाणार आहे. केंद्र सरकारने अलीकडेच पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संसदेत एक नवीन कायदा संमत केला आहे. महाराष्ट्रात यासंदर्भात आधीपासूनच स्वतंत्र कायदा अस्तित्वात असला, तरी केंद्राचा कायदा अधिक कडक आणि प्रभावी असल्याने तो राज्यातही लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी आवश्यक असणारी सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया येत्या पंधरवड्यात तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले.

## मुंबईत पोलीस कॉन्स्टेबलला...

किरण इंदुलकर हा बीडीडी नायगाव येथील रहिवासी आहे. इंदुलकर पूर्वी मालवणी पोलिस ठाण्यात कार्यरत होता. त्याला या परिसरातील ड्रग्ज नेटवर्कची माहिती असल्याचा संशय आहे. मालवणी पोलीस ठाण्यात असताना किरण इंदुलकर हा अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळीच्या संपर्कात आला होता. त्यावेळीच त्याच्याबाबत संशय असल्यामुळे किरण इंदुलकर हा तेव्हापासूनच संबंधित तपासयंत्रणांच्या रडारवर होता. यापूर्वीही किरण इंदुलकर याच्याबाबत तक्रारी आल्या होत्या. दोन वर्षांपूर्वी ताकीद देऊन इंदुलकरची बदली करण्यात आली होती. तसेच त्याला निलंबितही करण्यात आले होते. सध्या ड्रग्ज प्रकरणात अटकेत असलेल्या इंदुलकरला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी मालवणी पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे. घटनेमुळे मुंबई पोलिसांच्या प्रतिमेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करा,...

१ लाख १० हजार कोटी रुपयांत करायचा घाट घातला जात आहे. हे सर्व कशासाठी केले जात आहे, हे जनतेला कळत नाही का? मुळात हा शक्तिपीठ महामार्ग पूर्णपणे अनावश्यक आहे. सरकार जाणीवपूर्वक आपली जबाबदारी टाळत आहे.''

राज्यातील इतर प्रश्नांकडे लक्ष वेधताना शेट्टींनी सरकारला खडे बोल सुनावले. ''राज्यातील सरकारी दवाखान्यांची वाईट अवस्था जाऊन बघा. सरकारकडून जनतेला साध्या मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. दुसरीकडे, राज्यात हळूहळू टोल नाक्यांची संख्या एवढी वाढली आहे की, आता सरकारने नेमकं करायचं काय?'' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

## आयुर्वेदिक संस्थांवर एफडीएची...

पडताळणी या मोहिमेत केली. या तपासणीमध्ये उत्पादक संस्थांच्या कारखाना परिसराची पर्याप्तता, आवश्यक व मंजूर तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता, चांगल्या उत्पादन पद्धतींची अंमलबजावणी, गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रत्यक्ष कामकाज, तसेच बॅच उत्पादन अभिलेखा, कच्चा माल व तयार मालाच्या चाचणीच्या नोंदी, प्रमाणित कार्यपद्धती, वितरण अभिलेख, तक्रार नोंदवही, स्थिरताविषयक माहिती अशा विविध बाबींची छाननी करण्यात आली. या छाननीनुसार १३५ संस्थांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या असून याबाबत स्पष्टीकरणाचे निर्देश दिले आहेत.

मान्यताप्राप्त तांत्रिक व्यक्तींची अनुपस्थिती, सक्षम तांत्रिक व्यक्तींच्या अनुपस्थितीत उत्पादन करणे, गुणवत्ता नियंत्रण विभाग कार्यरत नसणे, उत्पादन व चाचणीसाठी आवश्यक यंत्रसामग्री, उपकरणे उपलब्ध नसणे, अस्वच्छ व निकषांचे पालन न करणे, बॅच उत्पादन अभिलेख व कच्च्या मालाच्या नोंदींचा अभाव व त्यामध्ये तफावत, उत्पादनांच्या लेबलवर चुकीचा उत्पादन दिनांक नमूद करणे, कच्च्या मालाचा अभिलेखा उपलब्ध नसणे, परिशिष्ट टी प्रमाणे संस्थेचा मंजूर नकाशा उपलब्ध नसणे, तांत्रिक कर्मचारी /कामगारांच्या वैद्यकीय तपासणीच्या नोंदी उपलब्ध नसणे, कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबतचा अभिलेखा उपलब्ध नसणे, औषधे दुषित होऊ नये याकरीता कार्यपद्धती उपलब्ध नसणे अशा त्रुटी आढळून आल्या.

# दौलताबाद टी पॉईंट ते वेरुळ व फुलंब्री ते खुलताबाद मार्गावरील जड वाहतूक मार्गात १३ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर दरम्यान बदल

छत्रपती संभाजीनगर, दि.१२ (प्रतिनिधी)- दौलताबाद टी पॉईंट ते वेरुळ आणि फुलंब्री ते खुलताबाद या मार्गावरील सर्व जड वाहतूक दि.१३ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर याकालावधीत बंद ठेवण्याचे आदेश पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव यांनी निर्गमित केले आहेत. या कालावधीत जड वाहतुकीचे पर्यायी मार्ग याप्रमाणे-

कन्नडहून वेरुळ–खुलताबाद–दौलताबादमार्गे छत्रपती संभाजीनगरकडे येणारी वाहने छत्रपती संभाजीनगर–शरणापूर फाटा–माळीवाडा–कसाबखेडा फाटा मार्गे कन्नडकडे जातील. फुलंब्री–खुलताबाद–वेरुळमार्गे कन्नडकडे जाणारी वाहने फुलंब्री–छत्रपती संभाजीनगर–शरणापूर फाटा–माळीवाडा–कसाबखेडा फाटा मार्गे कन्नडकडे जातील. तसेच वैजापूर–शिवूर–पाचपीरवाडी–वेरुळ–खुलताबादमार्गे फुलंब्रीकडे जाणारी वाहने वैजापूर–शिवूर–पाचपीरवाडी–शरणापूर–छत्रपती संभाजीनगरमार्गे फुलंब्रीकडे जातील.

श्रावण महिन्यात प्रत्येक शनिवारी खुलताबाद येथील श्री भद्रा मारुती देवस्थानात आणि सोमवारी वेरुळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पायी तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांनी येतात. त्यामुळे होणारी गर्दी लक्षात घेता हा बदल करण्यात आला असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दैनिक लोकविजय
CHANGE OF NAME
OLD NAME - SNEHLATA KAILAS SHINDE
NEW NAME - SNEHALATA KAILAS SHINDE
ADD - RH NO 5,GAGANGIRI HOU SOC,NR SANKET NURSING HOME, SHAHNOORWADI, AURANGABA 431001.